अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मोदींबरोबरच मतदारांच्या समंजसपणाचा विजय

स्वतंत्र भारताच्या इतिहासामध्ये राजकारणाने एक मोठे निर्णायक वळण घेतले आहे. १९७७ सालीसुध्दा जनता लाटेमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर मतदान झाले नव्हते. आणि कोणत्याच एका पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले नव्हते. भारतीय जनता पार्टीने स्वत:च्या ताकदीवर पूर्ण बहुमत मिळवून नक्कीच एक राजकीय इतिहास घडवला आहे. आतापर्यंत अनेक निवडणुकांमध्ये आणि विशेषत: १९८४ पर्यंत काँग्रेसला पूर्ण बहुमत मिळत आले त्यानंतर आघाडी सरकारांचे युग सुरू झाले. यापुढे भारतात आघाडी सरकारांचेच युग राहील. कोणत्याही एका पक्षाला पूर्ण बहुमत मिळणार नाही असा निष्कर्ष काढला गेला होता. आतादेखील नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार जाहीर केल्यानंतर प्रत्यक्ष भारतीय जनता पार्टीलासुध्दा आपण २७२चा जादुई आकडा पार करू याची खात्री वाटत नव्हती. आणि त्याचबरोबर काँग्रेसलादेखील आपला इतका प्रचंड धुव्वा उडेल अशीही अपेक्षा नव्हती. याचा अर्थ असा होतो की ज्या लोकसभा निवडणुकीमधला अंडरकरंट किंवा ज्याला छुपी लाट म्हणता येईल ती विजयी झालेल्या भाजपाला आणि पराभूत झालेल्या काँग्रेसलाही लक्षात आलेली नाही. एक्झीट पोलसच्या अंदाजांमध्ये भाजपाला बहुमत मिळण्याची शक्यता व्यक्त केली होती.

मात्र त्याबरोबरच काँग्रेस किंवा यूपीएला सव्वाशे जागांचीही खात्री दिली गेली होती. प्रत्यक्षात मात्र चित्र खूप वेगळेच समोर आले आणि भारतीय जनता पार्टी हा निर्णायक बहुमत मिळवणारा पक्ष म्हणून समोर येऊ शकला. भारतीय लोकशाहीच्या इतिहासामध्ये या निवडणुकीने सर्वात महत्त्वाची गोष्ट कोणती सिध्द केली असेल तर ती म्हणजे मतदारांनी दाखवलेली परिपक्वता किंवा त्यांच्यातला वाढीला लागलेला राजकीय समंजसपणा आहे. या दोन कारणांमुळे निकालाची पारडे विरुध्द दिशेला बदलू शकली. म्हणजेच या विजयाचे श्रेय भारतीय जनता पार्टी घेत असताना त्यामागे केवळ या पक्षाची ध्येयधोरणे किंवा नरेंद्र मोदी यांचे मॉडेल कारणीभूत नाही. तर त्याबरोबरीने परिस्थितीजन्य असे घटक या पाच वर्षांत निर्माण झाले की, त्या घटकांनी भारतीय जनता पार्टीला अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली. एक राजकीय पक्ष म्हणून भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या विजयाबद्दल अभिनंदन करीत असताना आम्ही मतदारांमधल्या राजकीय परिपक्वतेचे स्वागत करीत आहोत. केवळ प्रचारापेक्षा मतदारांनी आपल्या स्वत:च्या विचारांशी प्रामाणिक राहून ज्यावेळेला जे मतदान केले त्याची इतिहासात नोंद व्हायला हवी. परिवर्तनासाठी दाखवली गेलेली ही परिपक्वता भविष्यात अजून मजबूत होईल असाच संदेश यातून मिळतो.

### परिस्थितीजन्य घटनांना मोठे श्रेय

पूर्णपणे अनपेक्षित निकाल लागल्यामुळे स्वाभाविकपणे भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. मात्र विजयाचा उन्माद न चढू देता त्याचा योग्य तो सन्मान राखला गेला. तर मतदारांच्या या राजकीय परिपक्वतेचा आदर भारतीय जनता पार्टीने केला असे म्हणता येईल. भारतीय जनता पार्टी या विजयामुळेसुध्दा गोंधळून गेल्यासारखी दिसत आहे. कारण सरकार बनवण्यासाठी इतर पक्षांचे पाय धरावे लागतील अशी अपेक्षा या पक्षाच्या नेत्यांना वाटत होती. आता त्याची कितपत गरज आहे. असा प्रश्न निर्माण होतो. म्हणूनच विजयाचे श्रेय घेताना त्याची मिमांसाही कशी करावी याबाबत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये हा गोंधळ दिसून येतो. ज्याप्रमाणे लालकृष्ण आडवाणींसारख्या वरिष्ठ नेत्याने या विजयाचे विश्लेषण केले पाहिजे असा शब्द वापरून मोदींना त्याचे श्रेय दिलेले नाही. भाजपाला मिळालेला विजय हा भ्रष्टाचार, कुशासन आणि महागाई या तीन कारणांमुळे मिळाला. असे मत मांडत असताना देशात मोदींची लाट होती. हे ते मान्य करायला तयार नाहीत. तशाच प्रकारचे मत सुषमा स्वराज यांनीही व्यक्त केले त्यांनीदेखील विजयाचे श्रेय मोदींच्या पारड्यात टाकलेले नाही हा भारतीय जनता पार्टीचा विजय आहे असे सांगून आपली सरळसरळ नाराजी दाखवून दिली. याचपध्दतीने उमा भारतीदेखील प्रतिक्रिया देण्याची शक्यता आहे. यावरून हा मिळालेल्या विजय भारतीय जनता पार्टी कसा पचवतो याबाबत नक्कीच प्रश्नचिन्ह निर्माण होते. खरे तर या पक्षाला न भूतो न भविष्यती असा विजय मिळाल्यानंतर अडवाणी किंवा स्वराज यांनी तितकीच समंजसपणाची प्रतिक्रिया द्यायला हवी होती. येणाऱ्या काळामध्ये मोदी पंतप्रधान होतील.

परंतु पक्षांतर्गत मतभेदांचे प्रहार त्यांना कायम झेलावे लागतील. हे लपून राहत नाही. खरे सांगायचे तर भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या या विजयाचे श्रेय त्या पक्षाबरोबरच गेल्या पाच वर्षांमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीलाही द्यावे लागेल. प्रामुख्याने अण्णा हजारे यांनी दिल्लीत केलेल्या भ्रष्टाचारविरोधी अभियानानंतर संपूर्ण देशभर एक विलक्षण जागृती निर्माण झाली. काँग्रेसने एकापाठोपाठ घोटाळे करण्याची शृंखला चालू ठेवली. आणि महागाईचा कडेलोट करून विकासाच्या मुद्याला जवळपास हद्दपार केले होते. विशेषत: प्रौढ आणि तरुण मतदारांसमोर राजकारणातल्या कोणताच आयडॉल शिल्लक राहिलेला नव्हता ही पोकळी भरून काढण्याचे काम नरेंद्र मोदी यांच्या रूपाने झाले. गुजरातच्या विकासाचे त्यांनी असे काही मार्केटिंग केले की, त्याचा आज मतपेटीतून त्यांना रोकडा फायदा झाला.

### नकारात्मक मतदानाचा परिणाम

यासाठीच ज्यावेळेला हा निर्णायक विजय प्राप्त झाला त्यावेळी भारतीय जनता पार्टीलादेखील आश्चर्य वाटले कारण केवळ मोदींच्या नावामुळे इतका परिणाम घडून येणे शक्य नव्हते. त्याला या पाच वर्षांतल्या परिस्थितीजन्य घटनांनी खूप मोठी साथ दिली आणि त्याचा एकत्रित लाभ भारतीय जनता पार्टीने करून घेतला. खरे तर ज्यावेळेला दिल्लीत आम आदमी पार्टीला सत्ता मिळाली त्यावेळेला भाजपाच्या सगळ्या नेत्यांची झोप उडाली होती.

परंतु आम आदमी पार्टीच्या सत्ता सोडण्याच्या निर्णयामुळे आणि आपापसातील मतभेदांमुळे लोकांच्या मनातील स्थान गमावले. आणि त्यालगोलग घोषित झालेल्या या लोकसभा निवडणुकांमध्ये विकासाचा मुद्दा पुढे करुन भाजपाने स्वत:चे स्थान निर्माण केले. प्रत्यक्ष या पक्षाचे कोणतेही विस्तृत संघटन नाही. पक्षाच्या ताकदीवरचा हा विजय नक्कीच नाही. भाजपाच्या बाजूने झालेले हे सकारात्मक मतदानही नाही तर काँग्रेसला नाकारण्यासाठी मतदारांनी केलेले हे नकारात्मक मतदान होते.आता भाजपा हा विजय किती सकारात्मक विजयामध्ये परावर्तीत करतो यावर बरेच काही अवलंबून राहील.